
REVIEW OF RESEARCH
ISSN: 2249-894X
IMPACT FACTOR : 5.7631(UIF)
VOLUME - 15 | ISSUE - 5 | FEBRUARY - 2026

# 'हे आसमंत मला दान' मधील काव्यदर्शन

डॉ. संदीप आत्माराम भेले
मराठी विभागप्रमुख, आदर्श कला, वाणिज्य आणि विज्ञान महाविद्यालय,
कुळगांव – बदलापूर, ता. अंबरनाथ, जिल्हा – ठाणे.
( महाराष्ट्र ) ४२१५०३

**सारांश :-**




कवी गणेश सांगोळकर ह्यांच्या 'हे आसमंत मला दान' या कविता संग्रहामधील कविता नव्या स्पंदनानी वाहून निघालेल्या आहेत. कवी नवीन पिढीतील असल्याने इथला नवा चक्रव्यूह आपल्या कवितेमधून त्यांनी रेखाटलेला आहे. 'माणूस' हा मुख्य विषय त्यांच्या कवितेमधून उभा झालेला जाणवतो. आजचा श्रीमंत वर्ग त्यांनी चालवलेली पिळवणूक शिक्षणात चाललेला भ्रष्टाचार, सामाजिक महापुरुषांच्या विचारांची होणारी पायमल्ली त्यांच्या कवितेचा एक भाग बनला आहे. कवी स्वतःवर अतोनात प्रेम करताना दिसतात. सोबतच ही भूमी इथला निसर्ग खास करून त्यांना प्रिय आहे. आपल्या भूमीशी चाललेली बेइमानी त्यांना खपत नाही. आणि म्हणूनच त्यांच्या शब्दांचा डोंगर आग ओकताना दिसतो. ही आग नुसतीच नाही तर, त्यांची ही धडपड, हळहळ मानवतेच्या करुणेसाठी आलेली आहे. इथली माणसं, आपल्या मातीची माणसं म्हणून त्यांना ते सतत आपल्या हृदयाशी जोडू पाहत आहेत. परंतु मानवी मनांचा दुखवटा त्यांच्या अंतरंगात सल करून जातो. आणि ते कवितेच्या विद्रोहातून ममते कडे धाव घेताना दिसतात. कवी प्रेमळ मनाचे आहेत. 'हे आसमंत मला दान' या कविता संग्रहात त्यांची प्रेम कविता ही जीवनाचे सुहास्य उकलताना दिसते. परंतु मानवी जीवनाने कवी अस्वस्थ दिसतात. माणसांनी या भूमीवर निर्माण केलेला भय त्यांना सारखा दुःखाच्या कक्षेत ओढताना दिसतो. आणि त्यामुळेच कवी सांगोळकर मानवतेची हाक मारतात. फुले, शाहू, बाबासाहेब यांच्या विचारात त्यांना खरे सौख्य दिसतं. हे आसमंत जणू त्यांना ह्या महापुरुषांनीच दान दिला आहे. हा त्यांचा आशावाद त्यांच्या कवितेमधून उतरला असे म्हणावे लागेल.

**बीजशब्द :-** आसमंत, दान, हुंकार, मानवता, कविता, जीवन, प्रतिभा, पैलू, झाडीबोली, भाषा, विद्रोह.

**प्रस्तावना :-**

कवी गणेश सांगोळकर यांच्या 'हे आसमंत मला दान' हा त्यांचा पहिला कवितासंग्रह. पहिलाच कवितासंग्रह असला तरी हा कविता संग्रह मनांचा ठाव घेणारा ठरला आहे. 'मानवी जीवन' हा विषय कवीच्या काव्य लेखनाचा असल्याने सांगोळकर यांचे काव्य विचार करायला भाग पाडते हे विशेष. कवी वैदर्भीय चंद्रपूर जिल्ह्यातील असून ह्या जिल्ह्यातील मानवी जीवन, निसर्ग, झाडीबोली, त्यांच्या काव्यातून जाणवते. माणसांच्या विचारात निर्माण झालेली तफावत, दुरावत चाललेला सलोखा, त्यातून निर्माल्याचे विजय हातात घेऊन मानवतेची पेरणी करायचे स्वप्न दाखविणारी कविता हुंकारतेत तयार झालेली जाणवते. कवी गणेश सांगोळकर यांच्या कवितेच्या बाबतीत

सुप्रसिद्ध साहित्यिक डॉ. यशवंत मनोहर ह्यांनी प्रस्तावनेत 'मानवतेच्या मांगल्याची कविता' असे संबोधले आहे. कवी प्रस्थापित समाज रचनेमुळे सतत आपल्या मनाला कोसताना दिसतात. त्यांच्या अंतरंगात निर्माण झालेली उणीव, त्यांच्या कवितेचा आरसा बनलेला आहे. निसर्गाकडे बघताना एक नजर त्यांची माणसांच्या किळस जगण्याकडे जाते. सौंदर्य त्यांना मोहवतो. परंतु इथल्या अगणित माणसांच्या कृत्याला ते सौंदर्यात रेखाटू शकत नाही. जीवनाची पाळ त्यांनी ओळखली आहे. 'दान' ही संकल्पना त्यांना अभिप्रेत आहे. म्हणजेच कवी मोठ्या मनाची विचार फुले त्यांना इथल्या समक्ष मानवी मनांच्या कक्षात ठेवायची आहेत. की ज्याचा सुगंध सतत दरवळत राहावा.

## विषय विवेचन :-

'हे आसमंत मला दान' या कवितासंग्रहात कवी गणेश सांगोळकर पहिल्याच कवितेत म्हणतात,

'माय म्हणजे,
तव्यावरची पोळी
अन बाप म्हणजे,
चुलीतला विस्तव...'

कवी ग्रामीण जीवनाशी निगडित असल्याने आई-वडिलांचं दुःख किती कठोर असतं, असे वास्तविक दर्शन त्यांनी रेखाटल आहे. आज सूर्याचा प्रकाश सर्व चरावर पडतो. तरीही इथल्या प्रकाशाला त्यांनी 'दिशाहीन' म्हटलं आहे. दुःख त्यांना पहाट होता क्षणीच जणू घेरतो आहे. असा देखावाच त्यांची कविता प्रगटते म्हणून कवीशी ओळ

'या निळ्या छताखाली
प्रेमाने दोन दिवस
जगून घेऊ !'

इथले संकटकालीन प्रसंग समोर आणताना दिसते. प्रेमाची भूख त्यांना हवी आहे. परंतु इथला मानवी चित्र रंग त्यांना उदास करताना दिसतो. 'लोकशाही' सारख्या कवितेतून कवीची भूमिका इथल्या राजकारणी माणसांवर हल्ला चढवताना दिसते. कारण सामान्य माणसं, त्यांची राबतांना दिसणारी हाडे त्यांना स्वस्थ बसू देत नाही. कवीची कविता परिवर्तनवादी आहे. नव्या आव्हानात नाते रोवणारी आहे. म्हणूनच प्राध्यापक केशव मेश्राम यांचे वाक्य समर्पक वाटते. ते म्हणतात, "कविता हा उत्कट भावविष्कार आहे, तिने परिवर्तनाशी नाते जुळविलेच पाहिजे." 1

माणसं असूनही अनोळखी पणाचं वास्तव सत्य कवीला नकोसा वाटतो. 'तरी भासतात, आज परकेच' कवीची ही ओळ खूप काही शिकवून जाताना दिसते. 'इतिहास' नावाची कविता 'माणूसबंध' जोडणारीच ठरलेली आहे. 'कोणता दिवस कसा येईल' आजच्या माणसाच्या गर्दीत याचा सुगावाच कवी देतात. जगाच्या या माणूसपण रेंगाळलेल्या कुशीत सारे नातलग असूनही कवी गणेश सांगोळकर यांची 'या जगात माझे कुणी नाही' ही कविता लक्षणीय ठरलेली आहे. ते म्हणतात,

"या जगात माझे कोणी नाही
इथे माणसं झाली बेईमान
त्यांनी खोवले आपले ईमान
ही नाती उरली नाही." (पृष्ठ क्रमांक १५)

कवीची प्रस्तुत ओळ माणसांच्या आजच्या बदललेल्या रूपाचे दर्शन साकारते. बेईमान, नीती असे शब्द हृदयाला पीळ पाडताना दिसतात. निसर्गातील झाडे किती मोलाची आहेत हे सांगणारी त्यांची 'झाडे' कविता प्रेमाचं खरं अंगण खुलवणारी 'प्रीती' कविता. सूर्य चंद्राचे अस्तित्व, आलेले युग, दुःख आणि विचार देणारी महापुरुषे, अशा कवीच्या विचार मंथनात मानवता कशी श्रेष्ठ आहे हे भान कवीचे विशेषपण साकारते.

“इथे भरला बाजार
भाव लागलेत जागोजागी

शाही (पृष्ठ क्रमांक २२) माणसांचे ढासळलेपण सांगणारी कवीची प्रस्तुत ओळ आहे. 'मनाच्या किमतीला वाव नाही'.... असे कवितेतून प्रगटताना मनाची चाललेली सारखी हळहळ समोर येते. म्हणूनच कवीला प्रकाश मानदृष्टीने पाहताना कवी प्रा. केशव मेश्राम म्हणतात, “प्रकाशाची प्रतीक्षा करणाऱ्यांचे हे गुंतागुंतींचे जटिल जगत. आहे अंधारात विरघळणारांचे आयुष्य उजाळण्यासाठी त्यांना सोबत घेऊन जाणाऱ्यांची ही कविता आहे.”

“जरी शिखर
तरी खालवा
या बंधात
तू आणि मी”( पृष्ठ क्रमांक २४)

“ठोकळ मन कुणाकडे
दिसतात नळकांडे पोकळ (पृष्ठ क्रमांक २५)

कविता संग्रहातील प्रस्तुत ओळी मानवतेचा गळच तयार करताना दिसतात. निसर्गातील रानवारा, इथला तरुण माणसांना लाभलेला पैसा.. होणारे देशांचे युद्ध आणि बुद्ध अशा आशयात रमतांना कवीची कविता पुन्हा पुन्हा विचार करायला भाग पाडते.”

“परंतु दोस्तहो
युद्धाने कधीच
बुद्ध हसत नसतात....” (पृष्ठ क्रमांक ३५)

बुद्ध समजावताना कवीची प्रतिभा विशेष रूपाने खुलून आलेली दिसते बुद्धाचा शांती मार्ग कवीला जोडतो आहे. डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या बघल आस्था, कवीचा खरा विश्वास दिसतो 'पाऊस' 'मन पाखरू पाखरू झालं' ह्यासारख्या कविता प्रेम करायला शिकवतात. तरी शेतकरी कामगार यांच्या व्यथेत कवी हतबल आणि दुःखग्रस्त असेच रूप घेऊन येतात. वर्षभर राबणाऱ्या शेतकऱ्यांचा शेतकऱ्यांच्या दुःखात सामील होत कवी म्हणतात,

“परंतु शेतकऱ्या
काल-परवापर्यंत खुशीत दिसणारी
तुझी माय ही राबतच गेली
आता तुझाही जन्म जातो ओरडत...
राबाराबा अन सिनऱ्याचे पोटभरा...” (पृष्ठ क्रमांक ४४)

स्वातंत्र्य असूनही खरे स्वातंत्र्यच इथल्या माणसांना उपभोगायला मिळाले नाही. असे स्वातंत्र्य कसल्या कामाचे अशी आर्त हाक कवीची आहे. शहर ते ग्रामीण ह्या दोन्ही ठिकाणाचा प्रभाव कवीच्या कवितेवर पडलेला जाणवतो. आणि म्हणूनच कवितेच्या रूपाने माणसांना ऊर्जा देण्याचे कार्य सांगोळकर यांची काव्यनिती करताना दिसते जीवन आणि माणूस किती अनमोल आहेत हे सांगण्याचे सामर्थ्य त्यांच्या कवितेनी जपले आहे. सत्याची कास, साधी माणसं... कालचे आणि आजचे जीवन अशा अनेक पैलूत कवींचा विश्वास जागृत झालेला जाणवतो. जात धर्म अशा विळख्यातून कवी मुक्त होण्याचा आग्रह करताना दिसतात. प्रत्येक माणसांना ते समतेच्या कक्षात गुंतवू पाहत आहेत. बुद्ध, फुले, शाहू, बाबासाहेब ह्यांनीच खऱ्या अर्थाने हे जग, आसमंत कवीला दान दिल... असा सुवर्णमयी श्वास त्यांच्या कवितेचा आहे असे म्हणता येईल.

## समारोप :-

'हे आसमंत मला दान' या कविता संग्रहातील काव्य दर्शन लक्षात घेता कवी गणेश सांगोळकर यांची विशाल अशी काव्य दृष्टी निदर्शनास येते. कवी काव्यातून मानवते प्रती असीम श्रद्धा बाळगताना दिसतात. त्यांना हा निसर्ग, प्रेम ह्या सर्व गोष्टी मान्य आहेत. परंतु इथल्या माणसांनी चालविलेला घातकवाद त्यांना कदापि मान्य नाही. म्हणून माणसाच्या कृतीवर त्यांची कविता प्रतिघात करतात प्रतिघात करत सक्षम ठरली आहे. मानवता जपताना त्यांनी इथल्या आदर्श पुरुषांचा आधार आपल्या कवितेला दिला आहे. त्यांच्या प्रेरणेनेच कवी गणेश सांगोळकर 'हे आसमंत मला दान' - सुचवताना दिसतात.

## निष्कर्ष :-

१) 'हे आसमंत मला दान' कवितासंग्रहातील कविता मानवता प्रदान करणाऱ्या आहेत.
२) नव्या आव्हानाला प्रेरित करताना कवीच्या कविता प्रगल्भित झालेले आहेत.
३) समक्ष सृष्टीच्या बंधातून कवीशी काव्य प्रतिभा स्फूर्तीदायक ठरलेली आहे.
४) साध्या शब्दांमधून उच्च विचारांची प्रेरणा हीच त्यामुळे 'हे आसमंत मला दान' ह्या कवितासंग्रहातील कविता लक्षणीय ठरले आहे.
५) कवितेमध्ये मुक्त छंद गेयता हा प्रकार सौंदर्यमयी गुंफन करताना मनास गुंतवताना दिसतो.
६) विशिष्ट बोलीचा म्हणजे झाडीबोली प्रभाव काव्याची निष्ठता जपते. असे म्हणता येईल.

## संदर्भ :-

१) संपादक केशव मेश्राम, 'विद्रोही कविता' कॉन्टिनेटल प्रकाशन, पुणे प्रथमावृत्ती १९७८ पृष्ठ क्रमांक १७
२) तत्रैव पृष्ठ क्रमांक २२